# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः23.03.2024** **वारःशनिवार**

---

1. पुनर्वापर करता येण्याजोग्या 'पुष्पक' या प्रक्षेपण वाहनाची इस्रोकडून यशस्वी चाचणी
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी भूतानच्या दौऱ्यावर; दोन्ही देशांमध्ये विविध क्षेत्रात सामंजस्य करार
3. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर विजय भटकर यांना यंदाचा पुण्यभूषण पुरस्कार जाहीर आणि
4. 14 व्या हॉकी इंडिया महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्र आणि हरियाणा संघाची अंतिम फेरीत धडक

**इस्रो-पुष्पक**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात, इस्रोने पुन्हा वापरता येण्याजोग्या पुष्पक' या प्रक्षेपण वाहनाची, कर्नाटकातील चित्रदुर्ग इथल्या चाचणी तळावर यशस्वी चाचणी केली. संपूर्ण स्वदेशी तंत्रज्ञानाचं हे प्रक्षेपण वाहन पूर्णपणे स्वयंचलित यंत्रणेद्वारे चालवणाऱ्या, त्याला यशस्वीपणे उतरवणाऱ्या आणि इंधन व्यवस्थापन करणाऱ्या चमूचं, इस्रोचे अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी अभिनंदन केलं आहे.

**पंतप्रधान-भूतान सन्मान**

भुतानच्या  दौऱ्यावर असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना काल भूतानचा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'ऑर्डर ऑफ द ड्रुक ग्याल्पो' प्रदान करण्यात आला. भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांनी थिम्पू इथं पंतप्रधानांना हा पुरस्कार प्रदान केला. हा सन्मान आपला वैयक्तिक सन्मान नसून भारत देश आणि त्यातील 140 कोटी भारतीयांचा हा सन्मान आहे, असं पंतप्रधान सन्मानाला उत्तर देताना म्हणाले. पंतप्रधान मोदी आणि भूतानचे पंतप्रधान शेरिंग टोबगे यांच्या उपस्थितीत दोन्ही देशांमधली द्विपक्षीय भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी परस्पर हिताच्या अनेक करारांवर काल स्वाक्षरी झाली. थिंपू इथं झालेल्या बैठकीत दोन्ही देशांनी पेट्रोलियम, ऊर्जा, क्रीडा यासह विविध क्षेत्रांशी संबंधित सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली.

**राष्ट्रवादी-जाहीरनामा समिती-मुंबई**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस, अजित पवार गटाची, जाहीरनामा समिती जाहीर करण्यात आली आहे. समितीच्या अध्यक्षपदी सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांची निवड करण्यात आली आहे. समितीत वीस सदस्य असून, त्यात मंत्री धनंजय मुंडे, मंत्री अनिल पाटील, विधानसभेचे उपसभापती नरहरी झिरवळ, मंत्री आदिती तटकरे यांचा त्यात समावेश आहे. महायुतीच्या नेत्यांनी काल मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शासकीय निवासस्थानी दिवसभर चर्चा केली. निवडणूक संचालन समितीची बैठकही यावेळी झाली. यापुढं आपण कोणतीही निवडणूक लढवणार नसल्याचा पुनरुच्चार ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केला आहे. ते काल  बारामतीमध्ये बातमीदारांशी बोलत होते. महाविकास आघाडीतल्या जागा वाटपावर चर्चा सुरू आहे, असं त्यांनी सांगितलं. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेच्या करावाईवर पवार यांनी टीका केली.

**चोक्कलिंगम-आढावा**

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी काल भंडारा- गोंदिया लोकसभा मतदारसंघातील निवडणूकविषयक पूर्वतयारीचा आढावा घेतला. शांततापूर्ण आणि निर्भय निवडणुकांसाठी यंत्रणांनी दक्ष राहावे असं प्रतिपादन त्यांनी यावेळी बोलताना केलं. तृतीयपंथीय मतदारांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग जिल्हा प्रशासनाने आश्वस्त करावा, असंही ते म्हणाले.

**<u>निवडणुका</u>**

40 टक्क्यांहून अधिक दिव्यांग असणाऱ्या व्यक्तींसाठी आणि 85 वर्षे पूर्ण झालेल्या वयोवृद्धांना मतदान प्रक्रिया सुलभ होण्याच्या दृष्टिने, भारत निवडणूक आयोगाने 'सक्षम' ॲप सुरू केलं आहे. या ॲपवर दिव्यांग मतदारांसाठी दिव्यांग म्हणून नोंदणी करण्याची, नवीन मतदार नोंदणी, मतदान केंद्र बदल तसंच व्हील चेअरची देखील विनंती करता येणार असून मतदार यादीत नाव शोधणे, मतदान केंद्र जाणून घेणे, तक्रारी नोंदविणे आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**<u>कोल्हापूर-माध्यमकक्ष</u>**

आगामी लोकसभा निवडणुकांच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यातील लोकसभा मतदारसंघ माध्यम कक्षाची स्थापना जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात करण्यात आली आहे. या माध्यम कक्षाला जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी काल भेट दिली आणि कामकाजाबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या.

**<u>हिंगोली-एक खिडकी कक्ष</u>**

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने, विविध राजकीय पक्ष, उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी यांना प्रचारविषयक विविध परवानग्या प्राप्त करणे सोयीचे व्हावे, यासाठी हिंगोली जिल्ह्यात 'एक खिडकी योजना कक्ष' स्थापन करण्यात आले आहेत. यामध्ये लोकसभा मतदारसंघनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर एक खिडकी कक्ष तसेच सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर एक खिडकी कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

**<u>धुळे, भंडारा-मतदार जनजागृती</u>**

मतदार जनजागृती, स्वीप कार्यक्रमांनुसार धुळ्यातील पांझरा नदीकिनारी काल मतदार जनजागृती कार्यक्रम झाला. भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने मतदार जागृतीसाठी पदयात्रा काढण्यात आली.

**<u>लोकशाही दिन</u>**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या आचार संहितेच्या कालावधीत म्हणजे एप्रिल आणि मे महिन्यात पुणे विभागातील पुणे, सातारा, सोलापूर, सांगली आणि कोल्हापूर या जिल्ह्यात विभागीय लोकशाही दिनाचं आयोजन केलं जाणार नाही. विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त वर्षा लड्डा यांनी काल ही माहिती दिली आहे.

**<u>पुण्यभूषण पुरस्कार-जळूकर</u>**

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर यांना, संगणकशास्त्र क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल यंदाचा प्रतिष्ठेचा पुण्यभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. पुण्यभूषण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष सतीश देसाई यांनी काल ही माहिती दिली. दोन लाख रुपये रोख आणि स्मृतीचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. याबाबत बोलताना सतीश देसाई म्हणाले...

याच पुरस्कार सोहळ्यात, सीमेवर लढताना जखमी झालेल्या जवान आणि वीरमातांनाही गौरविण्यात येणार आहे.

**<u>रिझर्वबँक-नागपूर, मुंबई,</u>**

रिझर्व्ह बँकेच्या केंद्रीय संचालक मंडळाची 607 वी बैठक काल नागपुरात गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या अध्यक्षतेखाली झाली. जागतिक आणि देशांतर्गत आर्थिक परिस्थिती, तसंच भू-राजकीय घडामोडी आणि जागतिक आर्थिक बाजारातल्या अस्थिरतेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. चालू आर्थिक वर्षात रिझर्व्ह बँकेनं डिजिटल पेमेंट, ग्राहक शिक्षण आणि जागरूकता यांमध्ये केलेल्या प्रगती संदर्भात या बैठकीत चर्चा झाली. या बैठकीत बँकेच्या 2024-25 या वर्षासाठीच्या अर्थसंकल्पाला देखील मंजुरी दिली असल्याचं आरबीआयच्या प्रसिद्धी पत्रात म्हटलं आहे.

**<u>ऑस्ट्रेलिया-वाणिज्यदूत</u>**

ऑस्ट्रेलिया भारताचा अतिशय विश्वसनीय भागीदार असून आगामी काळात व्यापाराव्यतिरिक्त, उच्च शिक्षण, कौशल्य विकास, चित्रपट सहनिर्मिती, कला आणि संस्कृती तसंच पर्यटन वाढविण्याबद्दल कसोशीने प्रयत्न करणार असल्याचं ऑस्ट्रेलियाचे मुंबईतील नवनियुक्त वाणिज्यदूत पॉल मर्फी यांनी काल मुंबईत सांगितलं. मर्फी यांनी काल राज्यपाल रमेश बैस यांची सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. पर्यटनाला अधिक चालना देण्यासाठी ब्रिस्बेन आणि पर्थ या शहरांसाठी मुंबईतून थेट विमानसेवा सुरु करण्याबाबत विचार करीत असल्याची माहिती मर्फी यांनी दिली.

**<u>धुळे-केजरीवाल अटक निषेध</u>**

दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय समन्वयक अरविंद केजरीवाल यांना झालेल्या अटकेच्या निषेधार्थ काल राज्यात विविध ठिकाणी निदर्शनं करण्यात आली. धुळ्यात आम आदमी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनं केली आणि या संदर्भात एक निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सुपूर्द केलं. नाशिकमध्ये देखील केजरीवाल यांच्या अटकेच्या निषेधार्थ आपच्या कार्यकर्त्यांनी काल रास्ता रोको आंदोलन केलं.

**<u>जलदिन-नवीमुंबई</u>**

जागतिक जल दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात पाणी बचत आणि पाण्याचा विवेकी वापर करण्याबाबत अधिकारी, कर्मचाऱ्यांनी काल सामूहिक शपथ घेतली. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सर्वांना शपथ दिली. नवी मुंबई महापालिकेकडे स्वत:च्या मालकीचं मोरबे धरण असलं तरी प्रत्येक व्यक्तीने स्वत:ला किती पाण्याची गरज आहे हे ओळखून पाण्याचा आवश्यक तेवढाच वापर करण्याचं आवाहन यावेळी करण्यात आलं.

**<u>हॉकी</u>**

पिंपरीतल्या मेजर ध्यानचंद मैदानावर सुरू असलेल्या 14व्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत यजमान महाराष्ट्र संघ आणि हरियाणाच्या संघानं अंतिम फेरीत धडक मारली आहे. या दोन्ही संघांमध्ये आता अजिंक्यपदासाठी लढत होणार आहे. काल झालेल्या अत्यंत चुरशीच्या उपांत्य सामन्यात महाराष्ट्र संघाने गतविजेत्या मध्य प्रदेश संघाला 2-1 अशी धूळ चारत अंतिम फेरीत धडक मारली. सलग दुसऱ्यांदा महाराष्ट्र संघाने अंतिम फेरी गाठली आहे. या सामन्यावर मध्यप्रदेश संघाने चांगली पकड मिळवली होती. शेवटची आठ मिनिटे बाकी राहिलेली असताना मध्य प्रदेश 1-0 अशा फरकाने आघाडीवर होता. मात्र महाराष्ट्र संघाने जोरदार मुसंडी मारत 2-1 अशी बाजी मारत अंतिम फेरी गाठली. काजल आटपाडकर आणि आकांक्षा सिंह या विजयाच्या शिल्पकार ठरल्या. तत्पूर्वी पहिल्या उपांत्य सामन्यात हरियाणा संघाने झारखंड संघाचा 4-0 असा एकतर्फी पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली.

**<u>हवामान</u>**

उन्हाच्या असह्य झळांनी हैराण झालेल्या कोल्हापूरकरांना काल काही काळासाठी गारवा मिळाला. सायंकाळी जिल्ह्यात पन्हाळा, कागल, आजरा तालुक्यात अनेक ठिकाणी पाऊस झाला. अचानक आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची दाणादाण उडविली. गेल्या आठवड्यापासून कोल्हापूर जिल्ह्यातील उन्हाचा पारा 36 अंशावर पोहोचला आहे. राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.